क्र.भूसंपादन/कात-१/जांभूळपाडा/सीआर-२२-२०२०
दि.२५/०६/२०२१
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र.१ उरण

## जाहीर नोटीस

राज्य शासनाने भूसंपादन अधिनियम २०१३ मधील तरतूदीप्रमाणे देय असलेल्या जमिनीच्या संपादना पोटी मोबदला व पुनर्वसनाच्या लाभापेक्षा संबंधित धारकांना एकंदरित जास्त लाभदायक तरतूदी देणारे धोरण नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.सीआयडी.१११२/प्र.क्र./२७४/नवि-१० दि.०१/०३/२०१४ व महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्र.सीआयडी३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/नवि-१० दि.२८/०२/२०१८ अन्वये जारी केले आहे. व उपरोक्त संपादनाखाली जमिनीबाबत शासन धोरणान्वये देय असलेल्या मोबदला व लाभ यासाठी संबंधित धारकांची संमती असल्यास सदर धोरणानुसार जमिन संपादना पोटी मोबदला व लाभ देण्याचे धोरण स्विकारलेले आहे.

सदर धोरणाच्या अनुषंगाने सिडकोच्या २२.५% योजनेअंतर्गत विकसित भूखंडाच्या मोबदल्यामध्ये जमीन संपादनाचा निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णया अंतर्गत सिडको प्रशासनाकडून प्रस्ताव क्र.सिडको/भूसं/जांभूळपाडा+चिर्ले/२०२०/SAP-१४९४१ दि.२९/०१/२०२० व प्रस्ताव क्र. क्र.भूसंपादन/टे-८/जांभूळपाडा+चिर्ले/भूसंपादन प्रस्ताव/२०२० दि.१०/०२/२०२० प्रमाणे नवी मुंबई विकास प्रकल्पाकरिता मौजे-जांभूळपाडा, ता.उरण येथील जमीन संपादन करणे प्रस्तावित आहे. त्या प्रस्तावांतर्गत खालील वर्णनातील जमिनी संदर्भात कब्जेदार सदरी असलेल्या खातेदारांनी २२.५% देय विकसित भूखंड नुकसान भरपाई स्वरुपात स्वीकारणे कामी संमती पत्र या कार्यालयाकडे दाखल केले आहे. यास्तव भूसंपादन अधिनियम २०१३ चे कलम २३क च्या तरतूदी अंतर्गत संपादन करण्याचे प्रयोजन आहे.

**गावाचे नाव -जांभूळपाडा**

| अ.क्र. | खातेदाराचे नाव | संपादन करण्याचा जमिनीचा स.नं./हि.नं | संपादन करण्याचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | कविता संजय जैन<br>गजानन तुळशिराम पाटील<br>गणपतराज जुहारमल जैन<br>गौतम सुरेश जैन<br>मनिष केवलचंद मेहता<br>सुमित मदनराज जैन<br>संजय जुहारमल जैन<br>संजय भवरलाल जैन | (९०)८बपै | २-८०-० |
| २. | अतुल केवलचंद मेहता<br>ओमप्रकाश लालारामजी चौधरी<br>किरणकुमार शोभालाल जैन<br>गणपतलाल मोहनलाल सामर<br>बाबुलाल शांतीलाल सिंघवी<br>मुकेश रुपचंद जैन | (११६)३२/६अ<br>(११६)३२/६ब<br>(११६)६ड<br>(११६)३२/६इ<br>(११६)३२/६ई | ०-६०-०<br>०-६०-०<br>०-६०-०<br>०-६०-०<br>०-६०-० |

सदर संपादनाकामी वैयक्तिक नोटीस दि. ०७/०८/२०२० रोजी पाठविण्यात आली आहे.

वर नमूद केलेल्या जमिनीची नवी मुंबई विकास प्रकल्पाकरिता भूसंपादन करण्याकरिता गरज आहे. व उक्त जमिनीचा भूसंपादनानंतर ताबा घेण्याचा शासनाचा हेतू असल्याने सदर जमिनीशी संबधित असलेल्या सर्वांनी जमिनीची नुकसान भरपाई २२.५% योजनेअंतर्गत मोबदला स्विकारणे बाबतच्या प्रस्तावाची माहिती सदर जाहीर नोटीसप्रमाणे देण्यात येत आहे.

सदरच्या भूसंपादनाकामी २२.५% योजनेअंतर्गत विकसित जमीन देणेकामी हरकत आहे अगर कसे याबाबत हितसंबंधितांचे म्हणणे या जाहीर नोटीसीद्वारे मागविण्यात येत आहे.

तसेच आपणांस हे सूचित करण्यात येत आहे की, सदर जमिनीतील अशा हितसंबंधाचा प्रकार आणि त्या हितसंबधांचे भरपाईबाबत जो कोणताही दावा सांगण्याची तुमची इच्छा असेल तर त्याचा तपशिल आपण सदर जाहीर नोटीसीचा तारेखापासून १५ दिवसाच्या आत देणे बंधनकारक आहे.

सदरचे कालावधीत कोणताही आक्षेप न आल्यास आपण दिलेली संमती ग्राहय धरण्यात येईल.

तसेच आपणांस हे ही सूचित करण्यात येत आहे की, आपले निवेदन हे लेखी स्वरुपात आणि जातीनी अथवा मुखत्यारामार्फत स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

उरण
दि. २५/०६/२०२१

(अश्विनी पाटील)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
मेट्रो सेंटर क्र.१ उरण